महाराष्ट्र शासन

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक ०८/०८/२०२४

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-०८२३ / प्र.क्र.१३०/पोल-३, दिनांक ०६ ऑगस्ट, २०२४.

**विषय :-** मार्वल या शासकीय कंपनीस संशोधन व दक्षता प्रयोजनांसाठी "Data Sharing" करण्याची आदर्श कार्यपध्दती विहित करणेबाबत.

******

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण- ०८२३/ प्र. क्र.१३०/पोल-३, दिनांक ०६ ऑगस्ट, २०२४. ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४०८०६१९३२०२३४२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

अपर पोलीस महासंचालक, (कायदा व सुव्यवस्था), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग , महाराष्ट्र राज्य, पुणे.
विशेष पोलीस महानिरीक्षक, (सायबर सुरक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण.

प्रत,

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

मार्वल या शासकीय कंपनीस संशोधन व दक्षता प्रयोजनांसाठी ***"Data Sharing"*** करण्याची आदर्श कार्यपद्धती विहित करणेबाबत.

# महाराष्ट्र शासन
## गृह विभाग
**शासन निर्णय क्र संकीर्ण-०८२३/प्र.क्र.१३०/पोल-३.**

दुसरा मजला, मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई. पिन-४०००३२.
दिनांक : ६ ऑगस्ट २०२४.

**संदर्भ** : शासन निर्णय, गृह विभाग, क्र. संकीर्ण-०८२३/प्र.क्र.१३०/पोल-३, दिनांक १६.०३.२०२४.

**प्रस्तावना.-**

राज्य पोलीस दलास *"Artificial Intelligence"* चा वापर करुन कायदा अंमलबजावणीचे कार्य अधिक प्रभावीपणे करता यावे म्हणून मार्वल नामक शासकीय कंपनीची स्थापना करण्यात आली आहे. उक्त कंपनीस संशोधन व दक्षता प्रयोजनांसाठी शासनाची कार्यालये व विभाग यांच्याकडून *"Data Sharing"* करण्याबाबत आदर्श कार्यपद्धती विहित करण्याची बाब शासनाच्या विचारधीन होती.

**शासन निर्णय.**

महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाच्या अधिपत्याखालील मार्वल नामक शासकीय कंपनीस संशोधन व दक्षता प्रयोजनांसाठी शासनाची कार्यालये व विभाग यांच्याकडून *"Data Sharing"* करण्याबाबत, जोडपत्रात निर्दिष्ट केल्याप्रमाणे, आदर्श कार्यपद्धतीस याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०८०६१९३२०२३४२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SWAPNIL GOPAL BORSE

Digitally signed by SWAPNIL GOPAL BORSE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=c6a6e7cad855fc787a96e36f11fbc87a9f66cfd9bad01184493f2735ad885627, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=8538CD1E408948F7D025537D5F6589BD8958D1B95322E66D2CC5EDF89AD0D79E, cn=SWAPNIL GOPAL BORSE
Date: 2024.08.06 19:46:39 +05'30'

**( स्वप्निल गोपाल बोरसे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राज भवन, मंत्रालय, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उप मुख्यमंत्री (गृह) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. उप मुख्यमंत्री (वित्त) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.

५) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा/विधानपरिषद, विधान भवन, मुंबई.
६) पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७) अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८) अपर पोलीस महासंचालक-नि-महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९) विशेष पोलीस महानिरीक्षक, सायबर, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१०) पोलीस अधीक्षक, नागपूर-ग्रा.-नि-मुख्य कार्यकारी अधिकारी, मार्वल.

**प्रत-**

१) अपर मुख्य सचिव (गृह) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) प्रधान सचिव (विशेष) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) प्रधान सचिव (विशेष) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) सर्व सह/उप सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) निवड नस्ती, पोल-३.

# जोडपत्र

(शा.नि., गृह विभाग, क्र. संकीर्ण-०८२३/प्र.क्र.१३०/पोल-३, दि.०६.०८.२०२४, याचे जोडपत्र).

## STANDARD OPERATING PROCEDURE FOR DATA SHARING AND DATA PROCUREMENT

### 1. Requisition of Data by MARVEL

1.1. Purpose: MARVEL may request data from State Government Departments, offices, or authorities thereunder for research and development purposes aimed at enhancing law enforcement and security capabilities.

1.2. Requisition Submission: The Chief Executive Officer (CEO) of MARVEL shall submit a formal requisition to the Home Department, Government of Maharashtra.

1.3. Requisition Details: The requisition shall include:

- Clear articulation of the purpose for which data is sought.
- Specific details regarding the nature, size, format, and intended use of the requested data.
- Timeframe within which the data is required.
- Any specific data processing or analysis requirements.

1.4. Approval Process:

- The Home Department shall review the requisition and seek necessary approvals from the relevant Department(s) of the State Government.
- In cases involving sensitive or confidential data, additional approvals may be required from higher authorities, as per prevailing regulations.
- Such approvals shall be granted as soon as possible but not later than 15 days.

1.5. Data Provision:

- Upon approval, the authorized custodian of the data within the concerned Department shall make the requested data available to the CEO of MARVEL.
- Data transfer shall occur through secure channels, such as encrypted storage devices or secure file transfer protocols.

1.6. Data Usage Agreement:

- A formal data usage agreement shall be established between MARVEL and the data-providing entity, outlining the terms and conditions of data usage, confidentiality, security, and restrictions on further dissemination.

1.7. Data Anonymization:

- Personally Identifiable Information (PII) shall be anonymised or de-identified to the extent possible before sharing with MARVEL, in compliance with data protection and privacy laws.

### 2. Data Analysis Requests by Departments

2.1. Purpose: State Government Departments, authorities, or offices involved in law enforcement may request MARVEL to analyze official data in their custody for research and vigilance purposes.

2.2. Requisition Submission:

- Departments shall submit their requisitions to the Home Department.

- Authorities or offices under a Department shall route their requisitions through their respective administrative Department.

2.3. Requisition Details: The requisition shall include:

- Clear articulation of the purpose of the data analysis and its relevance to law enforcement objectives.
- Specific details regarding the nature, size, and format of the data to be analyzed.
- Desired outcomes or insights expected from the analysis.

2.4. Approval Process:

- The Home Department shall review the requisition and grant approval based on the relevance of the analysis to law enforcement objectives and the availability of MARVEL's resources.
- Such approvals shall be granted as soon as possible but not later than 15 days.

2.5. Data Sharing Mode:

- Data sharing for analysis shall occur through secure offline channels or similar to MARVEL's data requisition process.

2.6. Analysis Results:

- MARVEL shall furnish a comprehensive report of the analysis results to the requesting Department, including findings, insights, recommendations, and relevant visualizations or statistical summaries.

2.7. Confidentiality:

- The analysis results shall be treated as confidential and shall not be shared with unauthorized parties without prior approval from the Home Department.

2.8. Feedback and Iteration:

- The requesting Department shall provide feedback to MARVEL on the analysis results, which can be used to refine future analyses or develop new research questions.

3. Miscellaneous-

3.1. Correspondence: All correspondence between MARVEL and Home Department shall be in digital mode.

3.2 Data Quality: Both MARVEL and the data-providing entities shall ensure the quality, accuracy, and completeness of the shared data.

3.3. Data Security: Robust data security measures, including encryption, access controls, and regular audits, shall be implemented to protect the confidentiality and integrity of the data throughout the sharing and analysis process.

3.4. Legal Compliance: All data sharing and analysis activities shall comply with relevant laws and regulations, including data protection and privacy laws.

3.5. Review and Update: This Standard Operating Procedure (SOP) shall be periodically reviewed and updated to reflect changes in technology, data handling practices, and legal requirements.

# डेटा सामायिकरण आणि डेटा प्राप्तीसाठी मानक कार्यपद्धती

१. मार्वल द्वारे डेटाची मागणी

१.१ प्रयोजन: कायदा अंमलबजावणी आणि सुरक्षा क्षमता वाढवण्याच्या उद्देशाने मार्वल ही संशोधन आणि विकासासाठी राज्य शासन विभाग, कार्यालये किंवा त्या अंतर्गत असलेल्या प्राधिकरणांकडून डेटाची मागणी करु शकेल.

१.२ मागणी सादरीकरण: मार्वल चे मुख्य कार्यकारी अधिकारी हे महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाला औपचारिक मागणी सादर करतील.

१.३ मागणी तपशील: मागणीमध्ये हे समाविष्ट असेल:

- डेटा मागविण्याचा उद्देश स्पष्टपणे नमूद करणे.
- मागणी केलेल्या डेटाचे स्वरूप, आकार, रचना आणि अपेक्षित वापरासंबंधी विशिष्ट तपशील.
- डेटा आवश्यक असलेली कालमर्यादा.
- कोणतीही विशिष्ट डेटा प्रक्रिया किंवा विश्लेषण आवश्यकता.

१.४ मंजुरी प्रक्रिया:

- गृह विभाग मागणीची समीक्षा करेल आणि राज्य शासनाच्या संबंधित विभागकडून आवश्यक त्या मान्यता प्राप्त करेल.
- संवेदनशील किंवा गोपनीय डेटाच्या बाबतीत, प्रचलित विनियमांनुसार, वरिष्ठ प्राधिका-यांकडून अतिरिक्त मान्यतेची आवश्यक असू शकेल.
- अशी मंजुरी ही लवकरात लवकर पण  दिवसांच्या आत देण्यात १५येईल.

१.५ डेटा पुरविणे:

- मंजुरीनंतर, संबंधित विभागातील डेटाचा अधिकृत संरक्षक हा मार्वल च्या मुख्य कार्यकारी अधिका-यास मागणी केलेला डेटा उपलब्ध करुन देईल.
- डेटा हस्तांतरण सुरक्षित माध्यमाने होईल, जसे की एनक्रिप्टेड स्टोरेज डिव्हाइस किंवा सुरक्षित फाइल ट्रान्सफर प्रोटोकॉल.

१.६ डेटा वापर करार:

- मार्वल आणि डेटा पुरवणाऱ्या संस्थेमध्ये औपचारिक डेटा वापर करार करण्यात येईल, ज्यामध्ये डेटा वापराच्या अटी आणि शर्ती, गोपनीयता, सुरक्षा आणि पुढील प्रसारणावरील निर्बंधांची रूपरेषा नमूद असेल.

१.७ डेटा निनावीकरण:

- डेटा संरक्षण आणि गोपनीयता कायद्यांचे पालन करुन, मार्वलला डेटा पुरविण्यापूर्वी वैयक्तिकरीत्या ओळखण्यायोग्य माहितीचे ही शक्य तितक्या प्रमाणात निनावीकरण केले जाईल.

२. विभागांद्वारे डेटा विश्लेषण विनंती

२.१ उद्देश: कायदा अंमलबजावणीमध्ये सहभागी असलेल्या राज्य शासन विभाग, प्राधिकरण किंवा कार्यालये संशोधन आणि दक्षता उद्देशाने त्यांच्या ताब्यात असलेल्या अधिकृत डेटाचे विश्लेषण करण्यासाठी मार्वलला विनंती करु शकतात.

२.२ मागणी सादरीकरण:

- शासन विभाग त्यांच्या मागण्या गृह विभागाला सादर करतील.
- शासन विभागांतर्गत असलेल्या प्राधिकरणांनी किंवा कार्यालयांनी त्यांच्या संबंधित प्रशासकीय विभागामार्फत त्यांची मागणी सादर करावी.

२.३ मागणी तपशील:मागणीमध्ये हे समाविष्ट असेल :

- डेटा विश्लेषणाचा उद्देश आणि कायदा अंमलबजावणीच्या उद्दिष्टांशी त्याचा संबंध स्पष्टपणे विशद करण्यात यावा.
- विश्लेषण करावयाच्या डेटाचे स्वरूप, आकार आणि रचना यासंबंधी विशिष्ट तपशील.
- विश्लेषणातून अपेक्षित परिणाम किंवा अंतर्दृष्टी.

२.४ मंजुरी प्रक्रिया:

- गृह विभाग मागणीची समीक्षा करेल आणि कायदा अंमलबजावणीच्या उद्दिष्टांशी विश्लेषणाच्या प्रासंगिकतेच्या आणि मार्वलच्या संसाधनांच्या उपलब्धतेच्या आधारे मंजुरी देईल.
- अशी मंजुरी ही लवकरात लवकर पण  दिवसांच्या आत देण्यात १५येईल.

२.५ डेटा शेअरिंग मोड:

- विश्लेषणासाठी डेटा शेअरिंग हे मार्वलच्या डेटा मागणी प्रक्रियेप्रमाणे सुरक्षित ऑफलाइन माध्यमाने होईल.

२.६ विश्लेषण परिणाम:

- मार्वल ही विनंती करणाऱ्या विभागाला विश्लेषण परिणामांचा एक विस्तृत अहवाल सादर करेल, ज्यात निष्कर्ष, अंतर्दृष्टी, शिफारशी आणि संबद्ध दृष्य किंवा सांख्यिकी सारांश समाविष्ट असतील.

२.७ गोपनीयता:

- विश्लेषणाचे निकाल गोपनीय मानले जातील आणि गृह विभागाच्या पूर्व मंजुरीशिवाय अनधिकृत पक्षांशी सामायिक केले जाणार नाहीत.

२.८ अभिप्राय व पुनरावृत्ती:

- विनंती करणारा विभाग विश्लेषण परिणामांवर मार्वलला अभिप्राय देईल, ज्याचा वापर भविष्यातील विश्लेषण सुधारण्यासाठी किंवा नवीन संशोधन प्रश्न विकसित करण्यासाठी करता येऊ शकेल.

३. संकीर्ण:

३.१ पत्रव्यवहार: मार्वल आणि गृह विभाग यांच्यातील सर्व पत्रव्यवहार हा डीजिटल माध्यमाने करण्यात येईल.

३.२ डेटा गुणवत्ता: मार्वल आणि डेटा पुरवणार-या संस्था ह्या दोन्ही सामायिक डेटाची गुणवत्ता, अचूकता आणि पूर्णता सुनिश्चित करतील.

३.३ डेटा सुरक्षा: डेटाच्या सामायिकरण आणि विश्लेषण प्रक्रियेत डेटाची गोपनीयता आणि अखंडता राखण्यासाठी एन्क्रिप्शन, प्रवेश नियंत्रणे आणि नियमित लेखापरीक्षण यासह डेटा सुरक्षेचे ठोस उपाय अंमलात आणण्यात येतील.

३.४ कायदेशीर अनुपालन: सर्व डेटा सामायिकरण आणि विश्लेषण कृती ह्या, डेटा संरक्षण आणि गोपनीयता याबाबतच्या कायद्यांसह, संबद्ध कायदे व विनियमांशी सुसंगत असतील.

३.५ पुनरावलोकन आणि अद्ययावत करणे: तंत्रज्ञान, डेटा हाताळणी पद्धती आणि कायदेशीर आवश्यकतांमधील बदलांना प्रतिबिंबित करण्यासाठी या मानक कार्यपद्धती वेळोवेळी पुनरावलोकन करण्यात्त येईल.

------